दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २१५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.३० ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


# शेतकऱ्यांना न्याय द्या, नंतर प्रकल्पाचा विचार करा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नैना परिक्षेत्रांतील शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आणि समस्या जाणून घ्या आणि त्या सर्वप्रथम मार्गी लावा, त्यांनतरच नैना अंतर्गत नगर नियोजन करा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी करतानाच, जो पर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाही तो पर्यंत या प्रकल्पाला विरोध असल्याचे ठणकावल्यामुळे अखेर सिडकोने शेतकऱ्यांच्या भावना समजून त्या सोडविणार असल्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.**



नैना अंतर्गत येणाऱ्या गावांच्या विकासाकरिता प्रशासनाने आत्तापर्यंत ११ नगर नियोजन योजना (T.P.S. Scheme) घोषित केल्या असून त्यापैकी फक्त 'नगर नियोजन योजना – १ (TPS 1) कार्यान्वित झालेली असून, 'नगर नियोजन योजना – २ बाबत निविदा निघाल्याचे कळते. अन्य योजनांबाबत (TPS 3 TO 11) फक्त शेतकऱ्यांना भूसंपादनाबाबत नोटीस देण्यात येत असून त्यांची संमती मागितली जात आहे. गेली आठ वर्षे नैना अंतर्गत शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या सिडको प्रशासनाकडे प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करून सुध्दा त्याबाबत सिडको प्रशासनामार्फत कुठल्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. फक्त शेतकऱ्यांना नोटीस पाठवल्या जात आहेत. त्यामुळे 'नैना' विरोधात स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत तातडीने विचारविनिमय होऊन निर्णय झाला पाहिजे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्या अनुषंगाने (दि. २८) सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनात सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल यांच्या समवेत आमदार प्रशांत ठाकूर व ग्रामस्थांची बैठक पार पडली.

या बैठकीस जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सुरेश वाघमारे, वामन वाघमारे, किशोर सुरते, राजेश पाटील, सचिन पाटील, प्रमोद भिंगारकर, सुनिल पाटील, आनंद ढवळे, ग्रामस्थ, सिडकोचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडत जो पर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली लागत नाही. तो पर्यंत नैना योजनेच्या अंलबजावणीला विरोध कायम असल्याचे स्पष्ट केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी नमूद केल्या प्रमाणे, सन २०१३ मध्ये नैना प्राधिकरण स्थापन झाल्यापासून आजपर्यंत सिडकोमार्फत 'नैना' अंतर्गत गावठाणांमध्ये कुठल्याही प्रकारची विकासकामे करण्यात आलेली नाहीत. प्रथमतः सिडकोने गावठाणामधील रस्ते, भूमीगत गटारे, पायाभूत सुविधा व पाणी पुरवठयावावतीत निश्चित काम करावे व नंतरच नगर नियोजन योजना (T.P.S. Scheme) राबवावी अशी शेतकऱ्यांची आग्रही भूमिका आहे. नैना प्रकल्प निश्चित किती कालावधीत पूर्ण होणार याबावतीत काही ठोस नियोजन असल्यास त्याबाबत अवगत करावे.

तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठकीत नमूद करताना, सदर जमिनीवर विकास करताना प्रशासनामार्फत अवाच्यासव्या रक्कम Development charges व Betterment charges च्या माध्यमातून आकारली जात आहे, त्याला शेतकऱ्यांचा पूर्ण विरोध आहे. हे चार्जेस रद्द करावेत अशी आग्रही मागणीही त्यांनी केली आहे. गावातील अथवा गावालगतच्या गुरूचरण जागा नैना अंतर्गत संपादित केल्यास, त्या सर्व जागांबाबत मिळणारा मोबदला / भूखंड गावठाण विस्तार अंतर्गत गावांना देण्यात याव्यात. नैना अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गावाकरिता मैदाने, उद्याने यासाठी राखीव जागा असावी. तसेच 'समाजमंदिर' (Community centre) हे जागा निश्चित करून प्रशासनामार्फत बांधून देण्यांत यावे व गावात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांसाठी (Social Trust) राखीव जागा हवी. तसेच इमारतींच्या पुर्नविकासाबाबत तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे, नगर नियोजन योजनेमध्ये सध्या अस्तित्वात असलेली सर्व बांधकामे नियमित करावीत व नंतर उर्वरित जागेवर नियोजन करावे. या सर्व मागण्या जोपर्यंत मान्य होत नाहीत, त्या कालावधीपर्यंत नैना परिक्षेत्रात येणारी सर्व बांधकामे प्रशासनामार्फत कमीत कमी रक्कम आकारून नियमित करण्यात यावीत, अशा शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुन्हा एकदा मागण्या मांडल्या. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्न, समस्या व त्या अनुषंगाने असलेल्या पत्राचं उत्तर सिडको प्रशासनाने दिलेच पाहिजे, अशीही आग्रही भूमिका स्पष्ट करताना शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोखरोख भूमिका मांडत आधी शेतकऱ्यांना न्याय द्या, नंतर प्रकल्पाचा विचार करा, असे अधोरेखित केले. त्यांच्या या आग्रही भूमिकेमुळे सिडको शेतकऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे मान्य केले तसेच यापुढे प्रत्येक बाबतीत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जाईल आणि तसे लेखी स्वरूपात शेतकऱ्यांना दिले जाईल, असे त्यांनी आश्वस्थ केले.

> शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सिडको प्रशासनाशी वारंवार चर्चा करून, त्यांना लेखी मागणी करून देखील प्रशासनाकडून शेतकऱ्यांना त्यांच्या पत्रव्यवहाराची लेखी उत्तरे दिली गेली नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष व संतापाची भावना आहे व 'नैना' प्रकल्प नको अशा भूमिकेपर्यंत नागरिक आले आहेत आणि अशातच नगरनियोजन योजना २ च्या कामाबाबत सिडको प्रशासनामार्फत निविदा काढण्यात आली आहे ते शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे आहे. जो पर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न सिडको सोडवीत नाही तो पर्यंत नगरनियोजन योजना २ चे काम करू देणार नाही.
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**

## संक्षिप्त...

### राज्यात आज १,३३८ नव्या रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज करोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत कालच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. तसेच दैनंदिन मृत्यूसंख्या मात्र कालइतकीच आहे. तर, आज बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या कालच्या तुलनेत मात्र आज घटली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात राज्यात १ हजार ३३८ इतक्या नव्या रुग्णांची नोंद झाली आहे.

काल ही संख्या १ हजार ४१८ इतकी होती. तर आज दिवसभरात एकूण १ हजार ५८४ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या २ हजार ११२ इतकी होती. तर, आजही ३६ रुग्णांचा मृत्यू झाला. काल ही इतकेच मृत्यू होते.

आज राज्यात झालेल्या ३६ रुग्णांच्या मृत्यूंनंतर राज्याच्या मृत्यूदर २.१२ टक्क्यांवरच स्थिर आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६४ लाख ४७ हजार ०३८ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.५५ टक्के इतके आहे.

## प्रत्येक गावामध्ये पाणी देणे, हाच आमचा संकल्प : ना.गुलाबराव पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र आणि देशामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत डीपीआर तयार करीत असताना प्रत्येक गावामध्ये पाणी देणे, हाच आमचा संकल्प असल्याचे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी काल (दि.२८ ऑक्टोबर ) रोजी माणगाव येथे केले.



माणगाव तालुक्यातील मांगरूळ येथील नळपाणी पुरवठा योजनेचा भूमीपूजन समारंभ गुरुवार, दि.२८ ऑक्टोबर रोजी संपन्न झाल्यावर लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ येथील सभागृहात महाड, माणगाव, पोलादपूर, विधानसभा क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात घेतलेल्याआढावा बैठकीच्या वेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार भरतशेठ गोगावले, म्हाडाचे सभापती विनोद घोसाळकर, श्री. अनिल नवगणे, प्रमोद घोसाळकर, सुरेंद्र म्हात्रे, अरुण चाळके, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, राजिप सदस्या अमृता हरवंडकर, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, सुजित शिंदे, गजानन अधिकारी, लोणेरे सरपंच रवींद्र टेंबे,माणगाव उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव दिघावकर, तहसिलदार प्रियांका आयरे, नायब तहसिलदार बी.वाय.भाबड, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, ज्या ज्या ठिकाणी पाण्याची गरज आहे त्या त्या ठिकाणी डीपीआर तयार करण्याचे आदेश यापूर्वीच दिले आहेत. शासनामार्फत विनंती केल्यावर सहा विभागामध्ये सहा पीएमसीबी नेमलेले आहेत, जेणेकरून डीपीआर लवकर तयार होऊ शकतील. सन–२०२४ पर्यंत प्रत्येक गावामध्ये पाणी मिळाले पाहिजे, आधी पाणी ४० लिटर पर माणसी मिळत होते, आता ते ५५ लिटर मिळायला हवे. त्या पार्श्वभूमीवरच ही आढावा बैठक घेण्यात आली आहे. काही प्रमाणामध्ये डीपीआर कमी असले तरी आता पीएमसी आल्यामुळे येत्या १० दिवसांमध्ये १०० गावांची मंजुरी एकाच दिवसामध्ये मिळेल. पाणी देणे हे पुण्य कर्म असून याकामी कोणतीही जात, धर्म, पक्ष न पाहता सर्वांना पाणी मिळाले पाहिजे, या दृष्टीने काम करा, असे आदेश पाणीपुरवठा मंत्री श्री.पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

## आदिती तटकरे यांनी गुलाबपुष्प देवून केले दिवा-रोहा पॅसेंजरच्या प्रवाशांचे स्वागत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

करोनाच्या पार्श्वभूमीवर गेली जवळपास दोन वर्षे बंद असलेली दिवा–रोहा पॅसेंजर सेवा आज सुरु होवून रोहा रेल्वे स्थानकात पोहोचली. यावेळी प्रवाशांच्या चेहऱ्यावरील सौख्य सर्वांना अनुभवायला मिळाले. या प्रवाशांचे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी गुलाब पुष्प देवून स्वागत केले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर गेले अनेक महिने बंद असलेली दिवा– रोहा ही मेमो गाडी सुरु करणे, प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय महत्व–ाचे होते. याची दखल घेत खासदार सुनील तटकरे मध्य रेल्वेकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने कोकणवासियांच्या प्रवासात महत्त्वाचा दुवा असलेल्या या रेल्वे गाडीला अखेर हिरवा कंदील मिळाला.



रोहा स्थानकात आज या पहिल्या गाडीच्या स्वागतासाठी प्रवासी मोठ्या उत्सा–हाने उपस्थित होते. यावेळी रोहा स्थानकावर मधुकर पाटील, विनोद पाशीलकर, विजय मोरे, नंदू म्हात्रे, महेंद्र गुजर, मयूर दिवेकर, महेश कोल्हटकर, राजू जैन, अमित उकडे, प्राजक्ता चव्हाण, सागर भोबड, विनीत वाकडे, रत्नप्रभा काफरे, मयूर पायगुडे, निलेश शिर्के, चंद्रकांत पार्टे, उदय शेलार, स्टेशन मास्टर कुशवाह, प्रवासी संघटना, आरपीएफ पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते.

### एसबीआय बँकेसह आयकर विभागाचे नोकरीचे खोटे नियुक्तीपत्र देवून

## ६ लाख ७५ हजाराची फसवणूक ; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तीन जणांनी संगनमत करून तुम्हाला एसबीआय बँक व आयकर विभागात नोकरीस लावतो असे सांगून तसेच त्या संदर्भातील खोटे नियुक्तीपत्र देवून ६ लाख ७५ हजार रुपये उकळल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

पनवेल जवळील शिरढोण येथे राहणाऱ्या एका ३० वर्षीय गृहिणीस आरोपी श्रावणी सुर्वे, अभय पाटील तसेच दिल्ली येथून आलेला एक अनोळखी इसम यांनी आपसात संगनमत करून सदर महिलेला एसबीआय बँकेत नोकरी देण्याचे त्याचप्रमाणे त्यांच्या दुसऱ्या सहकारी यांना आयकर विभागामध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवून त्यांना खोटे (बनावट) नियुक्तीपत्र देवून त्या दोघींचा विश्वास संपादन करून लबाडीच्या इराद्याने त्यांच्याकडून या त्रिकुटाने वेगवेगळ्या बँकेतून पैसे वळते करून व रोख रक्कम घेवून अशी जवळपास ६ लाख ७५ हजार रुपये किंमतीची फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय पेन्शन योजना हटवा दिन ; सरकारी कर्मचाऱ्यांचा ठिय्या आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

राष्ट्रीय पेन्शन योजना (एनपीएस) हटवा या साठी राज्य भरातील राज्य कर्मचाऱ्यांनी सर्व सरकारी कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले. उरण तहसिल कार्यालयासमोर देखिल उरण तालुक्यातील राज्य सरकारी कर्मचारी व निम राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले.

१ नोव्हेंबर २००५ पासून महाराष्ट्र राज् शासनाने परिभाषित अंशदान पेन्शन योजना (डीसीपीएस) राज्य कर्मचाऱ्यांना लागू केली. सन २०१५ पासून या योजनेचे रूपांतर राष्ट्रीय पेन्शन योजनेत (एनपीएस) मध्ये झाले. गेल्या १६ वर्षात संबधित एनपीएस धारक कर्मचारी, त्यांचे अनुज्ञेय हक्क डावल्यामुळे कमालीचे भरडले जात आहेत. त्यामुळे ही राष्ट्रीय पेन्शन योजना रद्द करावी यासाठी राज्यव्यापी ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांकडून पुढील



मागण्या करण्यात आल्या आहेत.

एनपीएस योजना रद्द करून जुनी परिभाषित पेन्शन योजना लागू करा, देशभरातील अनेक राज्यांनी जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करावी अशा शिफारसी त्या त्या विधानसभा ठरावाद्वारे केंद्र शासनाकडे केल्या आहेत. महाराष्ट्राने तशी शिफारस करावी, मधल्या कालावधीत केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एनपीएस राज्यातील कर्मचाऱ्यांना

.../२

## अनिल देशमुख यांना दणका; समन्स रद्द करण्यास न्यायालयाचा नकार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनी लॉंड्रिंग प्रकरणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना ईडीने बजावलेले समन्स रद्द करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला. कारवाईपासून संरक्षण हवे असल्यास तो विशेष न्यायालयात जाऊ शकतो, असे हायकोर्टाने सांगितले.

गेल्या काही महिन्यांपासून अज्ञा–तवासात असलेल्या माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा शोध घेण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांच्या हालचाली पुन्हा वाढल्या आहेत. त्यांचा ठावठिकाणा मिळविण्यासाठी सक्तवसुली संचालनालय, (ईडी) केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला (सीबीआय) कळविण्यात आले असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. त्यामुळे येत्या काही दिवसांत त्यांना

.../२

## राज्यसभा खासदार उपविधान समितीकडून अलिबाग समुद्रकिनाऱ्याची पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यात स्वच्छता अभियान, घनकचरा व्यवस्थापन, जल प्रदूषणाच्या कायद्याचे पालन होत आहे का याचा अभ्यास करण्यासाठी राज्यसभेच्या खासदार उपविधान समितीने अलिबाग समुद्रकिनाऱ्याची काल (दि.२८ ऑक्टोबर) रोजी याबाबतची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नगरपालिका मुख्याधिकारी श्रीमती अंगाई साळुंखे, नगरसेवक, इतर अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

अलिबाग समुद्रकिनारी स्वच्छता अभियान, घनकचरा व्यवस्थापन, जल प्रदूषणाबाबत असणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत आहे का, समुद्राचे प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे, या कायद्याची अंमलबजावणी करताना स्थानिक प्रशासनाला काय अडचणी येत आहेत, याबाबतची माहिती या समितीमार्फत घेण्यात आली. या समितीने अलिबाग समुद्रकिनाऱ्याची पाहणी करून कुलाबा किल्ल्यालाही भेट दिली. या समितीत खासदार प्रतापसिंग बजवा, खासदार वंदना चव्हाण, दुष्यांत चव्हाण, विकास महात्मे, राम विचार नेताम, नरसिंह राव, तिरुची सेवा, विशाल सिंह, अरुण शर्मा, रविंद्र कुमार, बी.के.सिन्हा, वी.वी.एस खऱ्यात, प्रदीप तामता, विवेक तनखा यांचा समावेश आहे.

समितीचा हा पाच दिवसांचा दौरा असून मुंबईत दोन दिवस पाहणी केल्यानंतर त्यांनी आज अलिबागला भेट दिली. त्यानंतर ही समिती गोवा राज्यात दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहे. राज्यसभेत विविध कायदे बनविले जातात. जल प्रदूषणबाबतही कायदा राज्यसभेत पारित केला आहे. मात्र जल प्रदूषण कायदे पाळले जात नसल्याने त्याचे वातावरणा–वर तसेच नागरिकांच्या आरोग्यावर दूरगामी वाईट परिणाम होतात. जल प्रदूषण कायद्याची अंमलबजावणी देशभरातील विविध राज्यातील प्रशासन योग्य पद्धतीने अंमलबाजवणी करीत आहेत का? यासाठी ही समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमार्फत वेगवेगळ्या राज्यात जाऊन जल प्रदूषणाबाबत अभ्यासपूर्ण माहिती घेतली जाते व त्यावर उपाययोजना सूचविल्या जातात.

# कै.दिनेश महाजन प्रथम स्मृती दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आ.अनिकेत तटकरेंच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

तळाशेत ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच कै, दिनेश महाजन यांचा गुरूवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वा प्रथम स्मृती दिन हा तिथी प्रमाणे त्याच्या राहत्या निवास्थानी करण्यात आला यावेळी कै. दिनेश महाजन मित्र मंडळ यांच्या तर्फे कै.काका साहेब चितळे स्मृती केंद्र संचालित जनकल्याण रक्तपेढी महाड यांच्या संयूक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



तसेच या रक्तदान शिबिराचे उदघाटन आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कै.दिनेश महाजन यांच्या अनेक आठवणीना आमदार अनिकेत भाई तटकरे यांनी उजाळा दिला.कै. दिनेश महाजन हे तळाशेत इंदापुर ग्रामपंचायत दोन वेळा सरपंच व एक वेळा माणगांव प.स.सदस्य होते. तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व खा.सुनील तटकरे यांच्या विश्वासातील एक निष्ठावंत कार्यकर्ते होते. कै.दिनेश महाजन यांच्या प्रथम स्मृती दिनांनिमित त्यांच्या निवास्थानी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यासाठी सकाळ पासून त्याच्या मित्र परिवार तसेच माणगांव इंदापुर विभागातील सर्वसामान्य नागरिक तसेच राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते यांचीमोठी गर्दी पाहवयास मिळत होती. यावेळी दिपक शेट जाधव, बाबु शेट खानविलकर, उदय अधिकारी, बाळा खातू, काका नवगणे, शेखर शेट देशमुख, अविनाश मांडवकर, संदेश शेट मालोरे, डाँ,आदेश घोणे, नितिन शेट घोणे, विलास शेट शिंदे, रूपेश तोडकर, पिट्या शेट खानविलकर, यावेळी उपस्थित होते. तसेच कै.दिनेश महाज यांचे पुत्र अभिजित महाजन हे रक्तदान शिबिर कार्यक्रमावर लक्ष ठेऊन रक्तदान केलेल्या व्यक्तीला स्मृती चिन्ह व प्रमाण पत्रक देवून सन्मानित करत होते.

# शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी बँकांनी कर्जरूपी आर्थिक बळ द्यावे : डॉ. रवींद्र मर्दाने

**दै.रायगड नगरी । कर्जत**

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे शासनाचे उद्दिष्ट सफल होण्यासाठी शेतकऱ्यांनी भात शेतीबरोबरच कुक्कुटपालन, शे-ळीपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, प्रक्रिया उद्योग अशा कृषिपूरक उद्योगधंद्यांची कास धरणे व त्याला यांत्रिकीकरणाची जोड देणे आवश्यक असल्याने बँकांनी शेतकऱ्यांची विविध कर्ज प्रकरणे योग्य वेळेत पूर्ण करून त्यांना कर्जरूपी आर्थिक बळ द्यावे, असे आवाहन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ रवींद्र मर्दाने यांनी येथे केले. वित्तीय सेवा विभाग भारत सरकार व जिल्हा अग्रणी बँक ऑफ इंडियाच्या पुढाकाराने येथील रॉयल गार्डनमध्ये आयोजित भव्य कर्ज मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बँक ऑफ इंडियाच्या रायगड विभाग प्रमुख शंपा बिश्वास होत्या.



व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले, बँक ऑफ इंडियाचे उपमहाव्यवस्थापक रमण परकार, जिल्हा अग्रणी बँक ऑफ इंडियाचे प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, न. प. मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील, विपणन व्यवस्थापक सिद्धेश राऊळ, तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे, आदिवासी सेवक पुरस्कारप्राप्त शेतकरी मनोहर पादिर, तालुका व्यवस्थापक राजू नेमाडे, आदिवासी ठाकूर समाज सेवा मंडळाचे तालुका अध्यक्ष चाहू सराई व युवक अध्यक्ष प्रकाश बांगारे उपस्थित होते.

डॉ. मर्दाने पुढे म्हणाले की, एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेऊन किसान क्रेडिट कार्ड, मुद्रा कर्ज, पीक कर्जासाठी असलेल्या त्रुटी बँक अधिकाऱ्यांनी हिरीरीने दूर कराव्या.डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने 'आत्मा ' अंतर्गत शेतकऱ्यांच्या सहली दापोली कृषी विद्यापीठात कृषी विभागाने आयोजित कराव्या जेणेकरून शेतकरी नवतंत्रज्ञान आत्मसात करतील. कोरोनाचा बागुलबुवा उभा करून कृषी उपक्रमांना टाळण्याच्या प्रवृत्तीवर त्यांनी नापसंती व्यक्त केली. कोरोना संकटात शेती क्षेत्रानेच देशाला तारले, हे सिद्ध होऊनही शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यास स्वारस्य दाखविल्या जात नाही,हे दुर्दैव असल्याचे त्यांनी नमूद केले. निरव मोदी, विजय मल्ल्यासारख्यांनी हजारो कोटी रुपयांनी देशाला डुबविले असताना त्यावर दुर्लक्ष करीत छोट्या छोट्या कारणांसाठी लाखो रुपये किमतीच्या जमिनीचे मालक असलेल्या प्रामाणिक शेतकऱ्यांना बँक अधिकारी २-३ लाख रुपयांसाठी दहा वेळा चकरा मारायला लावतात, हे चित्र बदलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयकुमार कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल हंडगर यांनी तर आभार सौम्या गुज्जर यांनी मानले. तुडुंब गर्दीने सभागृह भरल्याने आयोजकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. बचत गटाच्या महिलांनी बनविलेल्या वस्तूंच्या स्टॉलनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते.

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे आणखी एक यश

# जिल्ह्यांमध्ये ४ नवीन डायलिसिस केंद्रांना मंजूरी तर या केंद्रांसाठी आठ डायलिसिस मशिन होणार उपलब्ध

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेल्या डायलिसिस या अत्यावश्यक सुविधेसाठी जिल्ह्यात चार नवीन डायलिसिस केंद्रांना मान्यता मिळविण्यासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांना यश मिळाले आहे.

आरोग्य विभागाच्या दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ च्या पत्रान्वये जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय पेण, रोहा, श्रीवर्धन आणि कर्जत येथे प्रत्येकी एक केंद्र आणि त्या ठिकाणी प्रत्येकी दोन डायलसिस मशिन व आरओ प्लँटला मंजूरी देण्यात आली आहे.

राज्यातील मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेल्या डायलिसिस सुविधेसाठी राज्यात ३५ नवीन डायलिसिस केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. त्यासाठी एकूण १०९ डायलिसिस मशिन आणि २५ आरओ प्लँट बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांच्या खरेदीसाठी आरोग्य विभागाने मान्यता दिली आहे.

मूत्रपिंड विकाराच्या उपचारासाठी डायलिसिस महत्वाचा घटक असून ही सुविधा नागरिकांना उपजिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी उपलब्ध झाल्यास त्याचा गरजू रुग्णांना निश्चितच लाभ होणार आहे. जिल्ह्यातील जनतेला उत्तम आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नांना भरीव यश मिळत आहे.

# मुरुड शहरातील रस्त्यांची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या काही महिन्यांपासून मुरुड शहरातील अंतर्गत रस्त्यांची खाचखळगे व खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली असून तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे.

मुरुड शहरातील मारुती नाका ते लेडिकुलसूम बेगम हॉस्पिटल, सर एस.ए. हायस्कूल ते रणदिवे पाखाडी,भोगेश्वर पाखाडी, शेगवाडा, पेठमोहल्ला भागातील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने त्याचा मुरुड जंजिरा पर्यटनावर परिणाम झाल्याचे व पर्यटक येण्यास राजी होत नसल्याने यांचा पर्यटनावर व व्यवसायावर परिणाम झाल्याचे दिसून येते आहे. शहरातील रस्त्यावर खड्ड्यांमुळे ऑटोरिक्षा, मोटरसायकल, कारचालकांना कसरत करावी लागते आहे.

रिक्षातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कमरेचे, मणक्यांच्या त्रास तसेच डिलेव्हरी पेशंट ला त्रास सहन करावा लागतो आहे. वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.एस.टी.तून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना देखील या रस्त्यावर खड्ड्यांमुळे त्रास सहन करावा लागतो आहे.

मुरुड जंजिरा हे एक निसर्गरम्य व ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर असून येथील प्रेक्षणीय स्थळांमुळे या स्थळांना मिनी गोव्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे परंतु गेल्या काही महिन्यांपासून शहरातील अंतर्गत रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन शहरातील अंतर्गत रस्त्यांची लवकरात लवकर दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे.

# चिमुकल्या हातांनी साकारले गडकिल्ले

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील प्रा.शाळा तळवली तर्फे घोस-ाळे या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या चिमुकल्या हातांनी विविध प्रकारचे गड-किल्ले बनवून सा-यांचे लक्ष वेधून घेतले आहे. या शाळेचे मुख्याध्यापक सचिन खेंकरे यांच्या संकल्पनेतून दिवाळी सणाचे पार्श्वभूमीवर गड-किल्ले बनविणे या उपक्रमातंर्गत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी वर्गानेही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या चिमुकल्या हातांनी अतिशय सुंदररित्या गड-किल्ले साकारले.तर तांबडी केंद्राचे केंद्रप्रमुख विवेकानंद पोटे व शा.व्य.समिती अध्यक्ष रूपेश चव्हाण यांनी येथे भेट दिली व गड-किल्ल्यांचे परीक्षण करून मुलांच्या सुप्त कलागुणांचे विशेष शब्दात कौतूक केले.या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच मुलांना पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. गड-किल्ले आपल्या इतिहासाच्या व परंपरेच्या खुणा आहेत.प्रत्येक गड-किल्ल्याला वेगळा इतिहास आहे.तर ते आपला सांस्कृतिक व ऐतिहासिक ठेवा आहे. दिपावली सणामध्ये विविध प्रकारचे किल्ले बनविण्यासाठी लहान मुलांची मोठीच स्पर्धा चाललेली असते.


## पनवेल महानगरपालिका

**आरोग्य विभाग**

**जाहीर सूचना**

**(घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणीबाबत)**

या जीर सुचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एस.ओ.१३५७ (इ) दिनांक ०८/०४/२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी पनवेल महानगरपालिका हद्दीत प्रभावीपणे चालू आहे. घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०१६ मधील तरतुदींनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे आपले शहर स्वच्छ ठेवणे हे कर्तव्य आहे. सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, थुंकणे, उघड्यावर लघवी अथवा लघुशंका करणे आणि उघड्यावर शौच करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी व तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार महानगरपालिकेला महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१७/प्रक्र.२५६ (१)/नवि-३४, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये घनचकरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांकडून खालीलप्रमाणे दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये १) सार्वजनिक स्थळी चेहऱ्यावर कायम मास्क / रुमाल न वापरणे, २) सोशल डिस्टन्सिंग न पाळणे, ३) सार्वजनिक स्थळी थुंकण्यावर बंदी, या बाबींचे पालन होणे गरजेचे आहे.

**(दंडाचे जोडपत्र)**

| अ.क्र. | कृती / बाब | दंड रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | रस्ते / मार्गावर घाण करणे | १५० |
| २ | उघड्यावर लघवी / लघुशंका करणे | १०० |
| ३ | उघड्यावर शौच करणे | ५०० |
| ४ | सार्वजनिक स्थळी चेहऱ्यावर कायम मास्क / रुमाल न बांधणे | ५०० |
| ५ | सार्वजनिक स्थळी (रस्ते, बाजार, रुग्णालय, कार्यालय इ.) थुंकणे | १००० |
| ६ | सोशल डिस्टन्सिंग न पाळणे (सर्व दुकानदार / फळे / भाजीपाला विक्रेते / सर्व जीवनावश्यक वस्तू विक्रेते इ. आणि ग्राहक यांनी सामाजिक अंतर (सोशल डिस्टन्सिंग) न राखणे.) | २०० (ग्राहक /नागरिक) २००० (आस्थापना मालक/दुकानदार/ विक्रेता) |

सर्व पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियम व अधिसूचनेची कठोर अंमलबाजवणी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सुरू करण्यात आली आहे. यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास नियमाप्रमाणे उचित दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/आरोग्य/८८७/२०२१
पनवेल महानगरपालिका कार्यालय, पनवेल

**सही/-**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**
**ता.पनवेल, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## राष्ट्रीय पेन्शन योजना हटवा दिन ; सरकारी कर्मचाऱ्यांचा ठिय्या आंदोलन

अनुज्ञेय करावा, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना १० टक्के अंशदानाऐवजी १४ टक्के अंशान रक्कमेची वजावट आयकर उत्पन्नातून करावी.

पुर्वीचा सेवेचा राजिनामा देवून नवीन सेवा स्विकारलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी परिभाषित पेन्शन योजना लागू करावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. या ठिय्या आंदोलनात महसूल विभाग, कृषी विभाग, वनविभाग तसेच इतर राज्य सरकारी विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सरकारच्या धोरणा विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## अनिल देशमुख यांना दणका; समन्स रद्द करण्यास न्यायालयाचा नकार

पकडण्यासाठी मुंबई, नागपूर या ठिकाणी सीबीआयकडून छापेमारी केली जाण्याची शक्यता आहे.

मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्याप्रकरणी ईडीने गेल्या पाच महिन्यांत चौकशीला हजर राहण्यासाठी पाच वेळा समन्स जरी केले होते; पण ते एकदाही हजर झालेले नाहीत. त्याचप्रमाणे सीबीआयने त्यांच्या कार्यालय व घरावर पाचवेळा छापे टाकले. देशमुख यांनी आपल्यावरील कारवाई रद्द करण्यासाठी न्यायालयात धाव घेतली. मात्र, त्यांना दिलासा न मिळाल्याने सीबीआय व ईडीकडून अटकेची कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशमुख हे अज्ञातवासात आहेत. मात्र, वरिष्ठांनी त्यांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्याने पुन्हा गतीने हालचाली करण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस व विशेषतः गाव मौजे : शहाबाज, तालुका : अलिबाग, जिल्हा : रायगड परिसरातील सर्व लोकांना ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल ज्योत्स्ना नरेश पाटील यांच्या सांगण्यावरुन व त्यांनी दिलेल्या माहितीवरुन खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही नामे श्री.नरेश नामदेव पाटील, राहणार साई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांच्या मालकीची असून त्यामध्ये सदर मिळकतीत त्यांची पत्नी नामे ज्योत्स्ना नरेश पाटील व मुलगी नामे नुतन नरेश पाटील यांच्या समान मालकीचा अधिकार आहे.

तरी सदर इसम नामे नरेश नामदेव पाटील हा त्याची पत्नी व मुलगी ह्यांच्या सोबत राहत नाही. नरेश नामदेव पाटील हे सदर मिळकत विक्री करण्याच्या विचारात व प्रयत्नात आहेत. या मिळकतीमध्ये आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदर व्यवहारामध्ये हरकत घेवून त्यावर तक्रार करण्यात येईल व त्यांना कोर्टाद्वारे नोटीस बजाविण्यात येईल.

सबब सदर मिळकत ही व्यक्ती नामे नरेश नामदेव पाटील ह्याची एकट्याची मिळकत नसून ह्या मिळकतीमध्ये त्याची पत्नी नामे ज्योत्स्ना नरेश पाटील व मुलगी नामे नुतन नरेश पाटील ह्या दोघींच्या सुद्धा समान मालकी हक्क आहे. तरी त्यांच्या संमती शिवाय कोणताही व्यवहार करणेस आपले अशिलांची सक्त हरकत आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन : तुकडी रायगड, गाव मौजे शहाबाज, तालुका : अलिबाग, जिल्हा : रायगड. मे. दुय्यम निबंधक साहेब अलिबाग यांचे हद्दीतील गट क्र.उपविभाग नं.८२१, क्षेत्र ०-२०-९०, आकार रु.पै. १.४४ यांसी**

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

पनवेल
दिनांक : २९/१०/२०२१

**सही/-**
**ॲड.ययाती पाटील**



मे.पांडे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.सागर गोंधळी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.११३४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.३०/११/२०२१

श्री.अकील इकबाल पटेल
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांची मावशी कै.ऐशाबी अ. गफूर तांबडे ही दि.११/०५/१९८२ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील तिच्या राहत्या घरी मृत्यू पावलेली / झालेला आहे. अर्जदार यांची मावशी कै.ऐशाबी अ. गफूर तांबडे हिच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी संबंधित महानगरपालिका यांस योग्य ते आदेश पारीत करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुरी कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२६ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१००४/२०२१
नि.नं.१५
ने.ता.०६/१२/२०२१

१) श्री.यशवंत रामा म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) श्री.रमेश रामा म्हात्रे
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.बळीराम रामा म्हात्रे
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.जासई, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.निर्मला लक्ष्मण कडू
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.९२-अ, वेश्वी, दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.ज्योत्सना कमळाकर पाटील
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिघाटी, पो.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.जयवंती रामनाथ म्हात्रे
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.झिंगारी गल्ली, जासई, ता.उरण, जि.रायगड
७) श्री.श्याम चंद्रकांत ठाकूर
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
रा.न्हावाखाडी, ता.पनवेल, जि.रायगड
८) श्रीमती.प्रमिला देवानंद तांडेल
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१८१-बी, मराठी शाळेजवळ,
करळ, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीमती.कामिनी संजय म्हात्रे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड
१०) श्रीमती.स्वाती श्रीकृष्णा ठाकूर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.६५९, जरीमरी मंदिराजवळ,
शिवाजीनगर, गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गिरजाबाई रामा म्हात्रे यांचे निधन दि.१२/११/२०२० रोजी झालेले आहे. तसेच कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांची मुलगी कै.सावित्रीबाई चंद्रकांत ठाकूर यांचे निधन दि.०५/११/२००० रोजी झालेले असल्याने श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे ह्यांनी कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु. केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | ४८ | ११ | २ | ०-५४-९ | १४.५० |
| | | २८ | ५ अ | ०-०५-१ | ०.८४ |
| | | ७८ | ६ अ | ०-००-५ | ०.०९ |

सदर संपादीत मिळकतींपोटी सिडकोकडून २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडको फाईल नं.४८ अंतर्गत दि.२४/१०/२०१६ रोजीच्या सोडतीद्वारे मौजे : पुष्पकनगर-दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.१३, सेक्टर नं.२, क्षेत्र ९६० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड कै.गिरजाबाई रामा म्हात्रे व इतर यांना वितरित करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहे.

श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे हे कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.यशवंत रामा म्हात्रे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गिरजाबाई रामा म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२८/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बेस्ट टिचर अँवार्ड प्राप्त सहदेव कापसे यांचा विशेष सन्मान



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

अविष्कार सोशल ण्ड एज्युकेशनल फाऊण्डेशन कोल्हापूर ( महाराष्ट्र राज्य ) इंडिया यांचेकडून राज्य स्तरिय बेस्ट टिचर वार्ड २०२१ ने सन्मान करण्यात आलेल्या सहदेव कापसे यांचा कोलाड बिटातील सर्व शिक्षक ब्रुंदाकडून विस्ताराधिकारी रत्नाकर कनोजे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला बिटातील कोलाड, येरळ, तिसे, पुगाव, कुडली पाचही केद्रांचे केंद्र प्रमुख रा.जि.प.शिक्षण समिती शिक्षण व क्रीडा समिती आमंत्रित सदस्य अजय कापसे, रोहा शिक्षक पतपेढीचे विद्यमान सदस्य चंद्रकांत वरखले, किशोर जाधव, अलिबाग पतपेढीचे संचालक महाडेश्वर व कोलाड बिटातील सर्व शिक्षक बंधू भगिनी मोठ्या सख्येंने उपस्थित होते. अजय कापसे, सौ.म्हात्रे, सौ.कोळेकर, चंद्रकांत वरखले, सौ.लहाने,सौ.कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त करून एकंदरीत ३२ वर्षाच्या सेवेबद्दल चांगले अनुभव सांगितले व पुढील सेवेला शुभेच्छा दिल्या. बेस्ट टिचर अँवार्ड हा पुरस्कार योग्य व्यक्तीला मिळाल्यामुळे पुरस्काराची किंमत वाढली आहे. असे गौरव उदगार रत्नाकर कनोजे यांनी काढून सर्वच बाबतीत चांगल्याप्रकारे काम केले आहे.गायन त्यांच्या आवडीचा विषय असून ते उत्तम कलाकारअसून शिक्षण क्षेत्रात ते चांगले शैक्षणिक काम करत आहेत, हे सांगितले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रीय शाळा तिसे येथील उपक्रमशिल शिक्षिका श्रीम.श्रद्धा बिरगावले यांनी ' सुंदर शब्दांची गुंफण करुन केले. व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. अशा या सुंदर कार्यक्रमाचे आभार संतोषनगर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.कुलकर्णी यांनी केले.

# पालीत कचऱ्याची समस्या बिकट; घंटागाड्या असूनही कचरा रस्त्यावर

## घाण व दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात; नागरिकांनी शिस्त पाळण्याची गरज

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत कच-याची समस्या बिकट झाली आहे. शहरात नगरपंचायतीच्या घंटागाड्या फिरून देखील काही नागरीक फुटक्या कचरा कुंड्या आणि रस्त्यावर कचरा टाकत आहेत. परिणामी घाण आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीतर्फे ४ वर्षांपूर्वी घंटा गाड्या सुरू करण्यात आल्या होत्या. सध्या नगरपंचायतीकडे ४ घंटागाड्या कार्यरत आहेत. या घंटा गाड्या येथील विविध भागात फिरून कचरा गोळा करतात.



आठवड्यातून रविवारीच फक्त घंटा गाड्या येत नाहीत. त्यानंतर सोमवारी अनेक ठिकाणच्या कचरा कुंड्या व रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढीग पडलेला असतो. तर इतर दिवशी देखील हीच परिस्थिती पहायला मिळते. घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार तसेच अनेक जण घरात किंवा सोयटीमध्ये साठवून न ठेवता लागलीच कचरा कुंड्यांमध्ये व रस्त्यावर टाकतात. तर काहीजण दिवसभर घरी नसल्यास जमा झालेला कचरा आजूबाजूच्या कचरा कुंड्यांमध्ये किंवा रस्त्यावर टाकून देतात. परिणामी कचऱ्याची समस्या जैसे थेच राहते. यामुळे नागरिकांसह भाविकांचे आरोग्य देखिल धोक्यात आले आहे. भटके कुत्रे व जनावरे हा कचरा अस्ताव्यस्त करतात. तसेच गुरे-ढोरे व भटके कुत्रे यातून अन्न शोधण्यासाठी जातात आणि हा सर्व कचरा व घाण रस्त्यावर व बाजुच्या गटारात पडते. आणि गटारे तुंबून आणखी समस्या उद्भवते.

पाली नगरपंचायतीकडे अधिकृत १५ ते १८ सफाई कर्मचारी आहेत. मात्र तुटपूंजा पगार व सेवासुविधांचा अभाव यामुळे प्रत्यक्षात जेमतेम ९-१० कर्मचारी रोज कामावर येतात. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण येतो. परिणामी सर्वच ठिकाणची साफसफाई करणे त्यांना शक्य होत नाही.

सध्या कचरा उचलण्यासाठी एक ट्रॅक्टर व दोन छोटा हत्ती घंटा गाड्या व एक ऍपे आहेत. यातील एक घंटागाडी छोटी व बंदिस्थ आहे. त्यामुळे तिच्यात अधिक कचरा सामावत नाही. तसेच पालीचा विस्तार वाढत असल्याने अधिकच्या घंटागाड्यांची आवश्यकता आहे.

# अपघाताचा बहाणा करुन व्यावसायिकाजवळची ५ लाखाची रक्कम लुटली

## अज्ञात टोळीचा खारघर पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकला धडक दिल्याच्या बहाणा करुन एका टोळीने मुंबईतील एका व्यावसायीकाची कार भररस्त्यात अडवून त्यांच्या कारमध्ये असलेली ५ लाख रुपयांची रोख रक्कम लुटून पलायन केल्याची घटना उघडकिस आली आहे. खारघर पोलिसांनी या टोळी विरोधात गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील तक्रार गुरुचरणलाल मारवा हे चेंबुर येथे राहण्यास असून त्यांचा कळंबोलीतील स्टील मार्केटमध्ये ऑटोमोबाईल स्पेअर पार्टसचा व्यवसाय आहे. मारवा एपीएमसी मार्केटमधील मित्राकडून पाच लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन आपल्या कारने कळंबोली येथे जात होते. यावेळी त्यांनी सदरची रक्कम आपल्या कार मधील डॅश बोर्ड मध्ये ठेवली होती. यावेळी मारवा खारघर जवळ फणसवाडी येथे आले असताना, त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवरुन आलेल्या दोघांनी त्यांची कार अडवून पाठीमागे त्यांच्या कारने एका मोटारसायकलला धडक दिल्याचे व ते पाठीमागे उभे असल्याचे सांगितले. त्यामुळे मारवा आपली बंद करुन पाठीमागे त्यांच्या कारमुळे कुणाला दुखापत झाली आहे, हे पहाण्यासाठी चालत गेले.

यावेळी काही अंतरावर त्यांना एका मोटारसायकलकासोबत एक महिला स्वत:चा पाय पकडून बसल्याचे निदर्शनास आले. यावेळी सदर महिलेने देखील मारवा यांना त्यांच्या कारची धडक लागल्यामुळे जखमी झाल्याचे सांगून त्यांना बोलण्यात गुंतवून ठेवले. याचवेळी मारवा यांच्या कारजवळ उभ्या असलेल्या दोघा लुटारुंनी त्यांच्या कारची काच फोडून कारच्या डॅश बोर्ड मध्ये ठेवलेली ५ लाखांची रोख रक्कम लुटून पलायन केले. महिलेसोबत बोलणी करुन मारवा काही वेळानंतर आपल्या कारजवळ आल्यानंतर त्यांच्या कारची काच फुटल्याचे व त्यातील रोख रक्कम चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव देऊन तक्रार दाखल केली.

# वडखळ येथे महा स्वच्छता अभियान

**दै.रायगड नगरी । पेण**

राष्ट्रीय स्वच्छता अभियानानिमित्त जे एस डब्लू फाउंडेशन, जिल्हापरिषदेचा पाणी व स्वच्छता विभाग ,नेहरू युवा केंद्र ग्रामपंचायत वडखळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाश्रमदान व स्वच्छता अभियान राबविण्यात आले या वेळी प्लास्टिक कचरा गोळा करून तो पुढील प्रक्रीयेसाठी पाठविण्यात आला.

वडखळ गावातील प्रत्येक चौकाचौकातून प्लास्टिक कचरा गोळा करून तो जेएसडब्लू कंपनीच्या प्रक्रीया केंद्रात पाठविण्यात आला. या वेळी वडखळ ग्रामपंचायचे सरपंच राजेश मोकल, उपसरपंच विजय म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक नितिन धोदरे, कर्मचारी, महीला मंडळाच्या सदस्या विविध क्रिडा मंडळे, जयकिसान विद्यामंदिर वडखळचे विद्यार्थी व शिक्षक तसेच नेहरू युवा केंद्राचे स्वयंवसेवक आदी सहभागी झाले होते. या वेळी स्वच्छतेबाबत आवाहन करण्यात आले.



# पनवेलमध्ये मोटारसायकलवरुन पडून एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव मोटरसायकलवरुन पडल्याने गंभीर जखमी झालेल्या प्रेमकुमार गोरे (४६) या व्यक्तीचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना कळंबोली रोडवर घडली. या अपघाताला स्वत: मोटारसायकल चालक प्रेमकुमार जबाबदार असल्याचे आढळुन आल्याने पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातातील मृत प्रेमकुमार गोरे हे पनवेल मधील पालेखुर्द येथे रहाण्यास असून ते आपल्या मोटारसायकलवरुन शिवशंभो नाका येथून कळंबोली रोडने जात होते. यावेळी भरधाव वेगात असलेल्या मोटारसायकलवरुन प्रेमकुमार यांचा ताबा सुटल्याने सदर मोटारसायकलवरुन ते खाली पडून गंभीर जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना गांधी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना कामोठे येथील एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्याठिकाणी उपचार सुरु असताना, त्यांचा मृत्यू झाला. प्रेमकुमार यांनी निष्काळजीपणे मोटारसायकल चालविल्याने सदर अपघात घडल्याचे व त्यात ते गंभीर जखमी होऊन मृत झाल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्यावरच निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.


राव साहेब

अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१५१६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्री.गणेश शांताराम खानावकर
वय : ४६ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.महेश शांताराम खानावकर
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते २ यांचे वडील कै.शांताराम तुकाराम खानावकर हे दि.३१/०८/२०२१ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.चांगुणाबाई तुकाराम खानावकर ह्या दि.१७/०७/१९९८ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची पत्नी कै.द्रोपदी शांताराम खानावकर या दि.०४/०७/२००७ रोजी पॅरामाऊंट हॉस्पिटल, पनवेल येथे मयत झाल्या आहेत.

कै.शांताराम तुकाराम खानावकर यांचे सामाईक मालकीच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | ९४ | ५० | १ | ०-१८-० |
| | | ४२ | २ | ०-५-६ |
| | | ३७ | २ | ०-१८-० |
| नावडे | १५६ | ३२ | ३ | ०-८-३ |
| | | ३३ | ३ | ०-६-८ |
| नावडे | ९४+९५ | ५० | ४ | ०-२४-२ |
| नावडे | २२ | १२० | २ | ०-२५-८ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.शांताराम तुकाराम खानावकर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. कै.शांताराम तुकाराम खानावकर व त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे.

**मिळकतीचे वर्णन (ब)**

| मौजे | घर क्र. | क्षेत्र चौ.फूट / चौ.मी. |
|---|---|---|
| नावडे, ता.पनवेल, जि.रायगड | १३५ अ | ५०४ |

**मिळकतीचे वर्णन (क)**

सदर मिळकती ह्या कै.शांताराम तुकाराम खानावकर, श्री.गणेश शांताराम खानावकर व श्री.महेश शांताराम खानावकर यांच्या सामाईक मालकीच्या आहेत.

| मौजे | सदनिका क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| के.ओरियन बिल्डींग, प्लॉट नं.४, से.१६, तळोजा फेज २ | ५०३, पाचवा मजला | २४.६६१ |
| के.ओरियन बिल्डींग, प्लॉट नं.४, से.१६, तळोजा फेज २ | १६०२, सोळावा मजला | २४.६६१ |
| के.ओरियन बिल्डींग, प्लॉट नं.४, से.१६, तळोजा फेज २ | १६०३, सोळावा मजला | २४.६६१ |
| के.ओरियन बिल्डींग, प्लॉट नं.४, से.१६, तळोजा फेज २ | १६०४, सोळावा मजला | ३७.४७८ |
| के.ओरियन बिल्डींग, प्लॉट नं.४, से.१६, तळोजा फेज २ | २३०२, तेवीसावा मजला | ३७.४७८ |

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.शांताराम तुकाराम खानावकर यांचे वारसदार या नात्याने कै.शांताराम तुकाराम खानावकर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.शांताराम तुकाराम खानावकर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२९/१०/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.भाकरे साो.कोर्ट

अॅड.क्षितीज डिंगोरकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.पनवेल यांचे न्यायालयात

चौ.अर्ज क्रं.१५०५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२२

कै.महिपती बाळा सपकाळ (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.मंदा महिपती सपकाळ
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.मधुकर महिपती सपकाळ
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.अनिता सिद्धार्थ जाधव
पुर्वाश्रमीची अनिता महिपती सपकाळ
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्री.मनोहर महिपती सपकाळ
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.सचिन महिपती सपकाळ
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.घर नं.ए/१५, ओम साई घरकूल सोसायटी,
उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार क्र.१ यांचे पती व २ ते ५ यांचे वडील कै.महिपती बाळा सपकाळ हे दि.०६/०१/२००७ रोजी मौजे : उसर्ली घरकूल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून येथील कायमचे रहिवासी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उसर्ली खुर्द, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**घर नं.ए/१५, तळमजला, विकासिनी घरकूल योजना, उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड या मिळकतीचे क्षेत्र ३०० चौ.फूट**

मयत कै.महिपती बाळा सपकाळ यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती.मंदा महिपती सपकाळ | ७० | पत्नी |
| २ | श्री.मधुकर महिपती सपकाळ | ५१ | मुलगा |
| ३ | सौ.अनिता सिद्धार्थ जाधव | ४२ | मुलगी |
| ४ | श्री.मनोहर महिपती सपकाळ | ३८ | मुलगा |
| ५ | श्री.सचिन महिपती सपकाळ | ३३ | मुलगा |

वरील प्रमाणे मयत कै.महिपती बाळा सपकाळ यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१०/२०२१
ठिकाण : पनवेल

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.श्री.राव साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील : अॅड.सौ.अनघा अ. कानिटकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१४२५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/१२/२०२१

श्री.मंदार गोपाळ बेहेरे
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.S/O गोपाळ वेहेरे, सदाशिव को.हौ.सो.
ब्लॉक नं.६०२, ६ वा मजला, टिळक रोड,
रतन टॉकीज जवळ, सदाशिव पेठ, जुना पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी प्रस्तुतचे अर्जातील अर्जदार श्री.मंदार गोपाळ बेहेरे यांनी भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दि.चौ. अर्ज क्र.१४२५/२०२१ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार यांचा सख्खा भाऊ कै.केदार गोपाळ बेहेरे हे दि.०६ जानेवारी २०२० रोजी पेण रायगड येथे मयत झाले आहेत.

कै.केदार गोपाळ बेहेरे यांचे बँक खात्यांमध्ये काही रक्कमा व मुदतबंद ठेवी (फिक्स डिपॉझिट) आहेत. सदर जंगम मिळकत अर्जदारास मिळणेकरिता सदरचा अर्ज मे.न्यायालयात दाखल केला आहे.

कै.केदार गोपाळ बेहेरे यांचे खालील बँक खात्यांमध्ये काही रक्कमा व मुदतबंद ठेवी (फिक्स डिपॉझिट) अस्तित्वात आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | खाते क्र./सिरियल नं. | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा-पनवेल | ३१६४५४७२९१४ | २२,६७७.२९/- |
| २ | बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-पनवेल (२७) बालाजी भवन, फ्लॅट नं.२३२ भाजी मार्केट जवळ, अप्पासाहेब पन्हाळे, पनवेल रायगड ४१०२२२ | २०१२१७८६२८० | ७,५८३.८८/- |
| ३ | आईडीबीआई बँक लि. ओल्ड पनवेल शाखा महेश भवन, टेलिफोन एक्सेंजच्या पाठीमागे पनवेल. रायगड महाराष्ट्र ४१०२०६ | ५२११००१०००८४५६ | ७,७०५.७६/- |
| ४ | आईडीबीआई बँक लि. ओल्ड पनवेल शाखा महेश भवन, टेलिफोन एक्सेंजच्या पाठीमागे पनवेल. रायगड महाराष्ट्र ४१०२०६ | सिरियल नं.२७८६१२२ | ९०,८०२/- |

उपरोक्त स्थावर व जंगम मिळकती अर्जदारांच्या नावे होणेकरिता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांस वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित किंवा अन्य कोणाची हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आमच्याकडे नमूद पत्यावर पुराव्याचे सर्व कागदपत्रासहीत येवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा या अर्जाची चौकशी करून अर्जदार यांना योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे जाहीर करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस आज दि.२७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.श्रीमती.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील : अॅड.सौ.अनघा अ. कानिटकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१४२४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/१२/२०२१

श्री.मंदार गोपाळ बेहेरे वगैरे २ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी प्रस्तुतच्या अर्जातील अर्जदार क्र.१ श्री.मंदार गोपाळ बेहेरे व अर्जदार क्र.२ सौ.श्रावणी शैलेश मराठे पुर्वाश्रमीची गीता गोपाळ बेहेरे यांनी भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दि.चौ. अर्ज क्र.१४२४/२०२१ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील कै.गोपाळ दत्तात्रेय बेहेरे हे दि.१० जानेवारी २०२० रोजी अष्टविनायक हॉस्पिटल पनवेल येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई कै.वसुधा गोपाळ बेहेरे या दि.६ जानेवारी २०२० रोजी पेण रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.गोपाळ दत्तात्रय बेहेरे यांची स्थावर व जंगम मिळकत व कै.वसुधा गोपाळ बेहेरे यांची जंगम मिळकत अर्जदारांस मिळणेकरिता सदरचा अर्ज मे.न्यायालयात दाखल केला आहे.

कै.गोपाळ दत्ताय बेहेरे यांच्या नावे असलेली स्थावर मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ | सि.टी.एस.नं. |
|---|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.ए २, पहिला मजला, ए विंग, मारुती अपार्टमेंट, टिळक रोड | ६०५ स्के. फूट | ६२६/७ |
| २ | शॉप नं.२, ए विंग, ग्राऊंड फ्लोअर, रचना रेसिडेन्सी | २२२ स्के. फूट कारपेट एरिया | ५९०/१, ५९१, ५९२, ५९० ए/बी/सी/डी ५८९ |

कै.गोपाळ दत्तात्रय बेहेरे यांचे खालील बँक खात्यांमध्ये काही रक्कम, मुदतबंद ठेवी (फिक्स डिपॉझिट) व एल आय सी च्या ठेवी अस्तित्वात आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | पॉलिसी नं./खाते क्र./सिरियल नं. |
|---|---|---|
| १ | भारतीय आयुर्विमा महामंडळ (एल आय सी) | पॉलिसी नं.९२५४३२७१३ |
| २ | आईडीबीआई बँक लि. ओल्ड पनवेल शाखा | ०१८९१०४००००६७७५९ |
| ३ | अॅक्सीस बँक लि.शाखा-पनवेल | ०३६०१०१०००३३३८१ |
| ४ | बँक ऑफ इंडिया शाखा-पनवेल | १२१२१२१०००११३५८ |
| ५ | बँक ऑफ महाराष्ट्र पनवेल | २०१२१८९२१६४ |
| ६ | आईडीबीआई बँक लि. ओल्ड पनवेल शाखा | सिरीयल नं.८३०२२६५८ |
| ७ | बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-पनवेल | सिरीयल नं.७०९०६५ |

कै.वसुधा गोपाळ बेहेरे यांचे खालील बँक खात्यांमध्ये काही रक्कमा, मुदतबंद ठेवी (फिक्स डिपॉझिट) व एल आय सी च्या ठेवी अस्तित्वात आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | पॉलिसी नं./खाते क्र./सिरियल नं. |
|---|---|---|
| १ | भारतीय आयुर्विमा मंडळ (एलआयसी) | पॉलिसी नं.९२५४३२७१४ |
| २ | बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-पनवेल | २०१२१६८८४२२ |
| ३ | आईडीबीआई बँक लि. ओल्ड पनवेल शाखा | सिरियल नं.८३०२२६५७ |
| ४ | बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-पनवेल | सिरियल नं.७०९०४५ |

उपरोक्त स्थावर व जंगम मिळकती अर्जदारांच्या नावे होणेकरिता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांस वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित किंवा अन्य कोणाची हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आमच्याकडे नमूद पत्यावर पुराव्याचे सर्व कागदपत्रासहीत येवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा या अर्जाची चौकशी करून अर्जदार यांना योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे जाहीर करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस आज दि.२५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## २९ टन कांद्या संदर्भात ४ लाख ७५ हजार रुपयाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईल फेसबुक साईटवर इंपोर्ट एक्स्पोर्ट संबंधित ग्रुपवर एका व्यक्तीची ओळख झाल्याने त्याने सांगितल्याप्रमाणे २९ टन कांदा हा दुबईला पाठवायचा आहे व त्या मोबदल्यात तुम्हाला ४ लाख ७५ हजार रुपये मिळतील असे आमिष दाखवून फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शह पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अमित माने यांची मोबाईल फेसबुक साईटवर इंपोर्ट एक्स्पोर्ट संबंधित ग्रुपवर अज्ञात व्यक्ती संतोष पवार यांची ओळख होवून त्यांच्याशी संपर्क साधला असता त्याने सांगितल्याप्रमाणे २९ टन कांदा हा दुबईला पाठवायचा आहे व त्या मोबदल्यात तुम्हाला ४ लाख ७५ हजार रुपये मिळतील असे आमिष दाखविले. परंतु आतापर्यंत टेलिग्राफीक ट्रान्सफर परत न करता त्याची खोटी पावती पाठवून सदर व्यक्तीने त्यांची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

## डॉ विनोद गिते कोरोना योद्धा व आरोग्य दुत पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉ. विनोद गिते यांना कोरोना योद्धा व आरोग्य दुत पुरस्काराने पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नवतरुण मित्र मंडळ यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल डॉ विनोद गिते यांचे अभिनंदन केले जात आहे. नवतरुण मित्र मंडळ सार्वजनिक नवरात्रौत्सव निमित्त पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांचे स्वागत करताना मंडळाचे कार्याध्यक्ष व भाजप युवा मोर्चा अध्यक्ष जितेंद्र काटकर आणि मंडळाचे अध्यक्ष प्रताप चव्हाण व मंडळाचे खजिनदार राजेश पाटील, राजु सावंत, सुभाष गावडे, आनंद सोनवणे, अजित लुबाळ, पकंज सोलनकर, तानाजी लोखंडे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच वैश्विक कोरोना संकटात नावडे शहरात मानवतावादी दृष्टिकोन ठेवून कोरोना बाधित आणि अन्य रुग्णांना योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांवर उपचार करणारे नावडे शहरातील डॉ विनोद गिते यांना कोरोना योद्धा व आरोग्य दुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कर्जत आगार १०० टक्के बंद ; एकही एसटी गाडी धावली नाही

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्य परिवहन महामंडळाच्या कामगारांच्या वेतन वाढ तसेच महागाई भत्ता आणि राज्य शासनात विलीनीकरण या मुद्दयावर आज कर्जत एसटी आगार येथील सर्व कामगारांनी संप पुकारून बंद ठेवले.या मागण्यांसाठी विभागीय आणि राज्य पातळीवर उपोषण सुरू असून त्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी एक दिवसीय संप पुकारण्यात आला असून कर्जत आगारातील सर्व कामगार संपात सहभागी झाल्याने कर्जत आगारातून आज एकही एसटी गाडी बाहेर पडली नाही.



महाराष्ट्र राज्यातील एसटी कामगारांच्या सर्व संघटना यांनी एकत्र येत स्थापन केलेल्या कृती समितीच्या माध्यमातून राज्यातील सर्व विभागीय कार्यलये आणि राज्य पातळीवर उपोषण सुरू आहे.त्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या मागण्या पुढे करण्यासाठी कर्जत एसटी आगार येथील कामगारांनी संप पुकारल्याने बंद पडला होता.कर्जत एसटी आगारातील तिन्ही कामगार संघटना यांचे सर्व सदस्य आंदोलनात सहभागी झाल्याने आज २८ ऑक्टोबर रोजी कर्जत एसटी आगारातून एकही एसटी गाडी धावली नाही. त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले असून कर्जत मध्ये एसटी कामगारांचे आंदोलन १०० टक्के यशस्वी झाले.

कर्जत एसटी आगारात काम करणाऱ्या एसटी कामगारांची कामगार संघटना,तसेच इंटक कामगार संघटना आणि कामगार सेना यांचे सर्व सदस्य यांनी सकाळपासून आंदोलन सुरू केले होते.कामगार संघटनेचे अध्यक्ष रमेश जाधव,सचिव नागेश भरकले तसेच इंटक कामगार संघटनेचे अध्यक्ष कमलाकर किरंडे,सचिव सुरेश पाटील आणि शिवसेना एसटी कामगार सेनेचे अध्यक्ष बबन ऐनकर, सचिव विशाल गेडाम यांच्यासह तिन्ही संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्य आंदोलनात सहभागी झाले होते. त्या कामगारांच्या २२ ड्युट्या रद्द झाल्या असून कोणत्याही कामगाराने आज दिवसभरात ड्युटी केली नाही असा दावा तिन्ही कामगार संघटना यांचे प्रतिनिधी कडून करण्यात आला.

# मुरुड एस.टी. आगारात दुसऱ्या दिवशीही एस.टी.बंद आंदोलन

## प्रमुख मागण्या मान्य करण्याची सरकारकडे मागणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड एस टी आगारातील कृती समितीमधील सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत एस टी बंद आंदोलन गुरुवारपासून सुरु केले असून दुसऱ्या दिवशीही सुमारे १८७ कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले होते.



एस टी महामंडळ सध्या निमसरकारी आहे त्यामुळे राज्यसरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे देय घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, बोनस तसेच वार्षिक वेतन वाढीचा दर कर्मचाऱ्यांना मिळत नाही त्यामुळे एस टी महामंडळाचे राज्य शासनामध्ये विलीनीकरण व्हावे अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केली आहे. दोन दिवस एस टी बंद असल्याने प्रवाशांचे व विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत असल्याने खिशाला नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

आमच्या अनेक वर्षांपासूनच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी तसेच एस टी महामंडळाचे राज्य शासनामध्ये विलीनीकरण करण्यासाठी आमदार गोपीचंद पडळकर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी पुकारलेल्या आंदोलनाला मुरुड एस टी आगार कर्मचाऱ्यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे व आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तो पर्यंत आंदोलन सुरुच राहील असे आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. तसेच एस टी कर्मचाऱ्यांनी किती वर्ष तुटपुंज्या पगारावर काम करणार अशी व्यथा मांडून सरकार आमच्या मागण्या त्वरित मान्य करेल अशी आशा व्यक्त केली.

# पादचाऱ्यावर हल्ला करुन लुटणाऱ्या अज्ञात लुटारुचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या बाजुला वावरणाऱ्या एका लुटारुने रात्रपाळीवरुन घरी परतणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यात सिमेंटचा ब्लॉक मारुन त्याच्या जवळ असलेला मोबाईल फोन व रोख रक्कम लुटून पलायन केल्याची घटना पनवेल रेल्वे स्थानकाजवळ घडली. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात लुटारु विरोधात जबरी लुटीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार भास्कर ढेकले (४०) हे पनवेलच्या आकुर्ली भागात भागात राहण्यास असून ते सकाळ मिडीयाच्या तळोजा येथील प्रेसमध्ये सीटीपी प्रोसेस ऑपरेटर म्हणून काम करतात. ढेकले हे रात्र पाळीवर कामाला गेले होते. त्यानंतर ते कामावरुन सुटल्यानंतर तळोजा येथून खारघर रेल्वे स्टेशनवर आले. तेथुन ते लोकलने पनवेल येथे गेल्यानंतर पनवेल रेल्वे स्टेशनच्या फलाट क्र १ जवळच्या संरक्षण भिंतीच्या मध्यभागी असलेल्या पायवाटेने आपल्या घरी जात होते.

यावेळी एका लुटारुने तंबाखु मागण्याच्या बहाण्याने ढेकले यांना अडविले. यावेळी ढेकले यांनी त्याला नकार दिल्यानंतर सदर लुटारुने त्यांची कॉलर पकडून त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांच्या खिशात असलेला मोबाईल फोन व रोख रक्कम लुटण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ढकले यांनी त्याला विरोध केल्यानंतर सदर लुटारुने बाजुलाच पडलेल्या डेब्रिज मधील सिमेंटचा ब्लॉक उचलून त्यांच्या डोक्यात मारुन त्यांना गंभीर जखमी केले.

त्यानंतर त्यांचा मोबाईल व रोख रक्कम लुटून त्याठिकाणावरुन पळ काढला. या मारहाणीत ढेकले गंभीर जखमी झाल्याने त्यांनी त्याच अवस्थेत आपले घर गाठले. त्यानंतर त्यांना प्रथम श्री हॉस्पीटलमध्ये व त्यानंतर लाईफ लाईन हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच खांदेश्वर पोलिसांनी ढेकले यांचा रुग्णालयात जबाब घेऊन अज्ञात लुटारु विरोधात जबरी लुटीचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याचा शोध सुरु केला आहे.

# बाजारभावापेक्षा कमी दरात दिवाळी फराळाचे सामान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दीपावली सणानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्यावतीने दिवाळी फराळाचे सामान बाजारभावापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

आज(दि. २९) या उपक्रमाचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कळंबोली येथे करण्यात आले. यावेळी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, राजेंद्र शर्मा, जिल्हा परिषेदच्या माजी महिला व बाल कल्याण सभापती प्रिया मुकादम, प्रकाश शेलार, अमर ठाकूर, शितू शर्मा, प्रकाश मुंबईकर, संदीप भगत, जमीर शेख, शितल कदम, दुर्गावती सहानी, प्रणाली यादव, विद्या परांडे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

दिवाळी निमित्त कामोठे, कळंबोली, खारघर, या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय येथे तर नविन पनवेल येथील नगरसेवक संतोष शेट्टी यांचे जनसंपर्क कार्यालय असे एकूण चार ठिकाणी दिवाळी फराळाचे सामान बाजारभावापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामध्ये रवा, मैदा, चणाडाळ, साखर, पोहे, गुळ, डालडा आणि गोडेतेल आदी वस्तूंचा समावेश आहे.



# प्रलंबित मागण्यांसंदर्भात एसटी आगाराचा पहाटेपासून बंद सुरू

## खोपोली कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला पाठींबा बस स्थानकात शुकशुकाट

**दै.रायगड नगरी । खोपोली**

एस टी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या थकबाकी पगारवाढ व महामंडळाचे शासनामध्ये विलीनीकरण संदर्भात विभागीय कर्मचा यांकडून आझाद मैदान येथे सुरू असलेल्या आंदोलनाला आज पहाटेपासून खोपोली शिलफाटा आगारातील सर्व कामगार संघटनांनी शंभर टक्के पाठिंबा दिल्याची माहिती प्राप्त झाली असूही पहाटेपासून वस्ती व्यतिरीक्त एकही गाडी कर्जत डेपो व पेण डेपो मधून न आल्याने खोपोली शिलफाटा बस डेपो मध्ये शुकशुकाट दिसून आले यामुळे एस मधून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाची पंचाईत झाली त्यामुळे खाजगी वाहनांचा आसरा घ्यावा लागला

राज्य परीवन मंडळ एस टी बस कर्मचारी वर्गाच्या संपामुळे आगारातील संपूर्ण वाहतूक ठप्प झाल्याची माहिती मिळताच खोपोली शिलफाटा आगारामध्ये सर्व कर्मचारी त्या ठिकाणी असल्याचे आढळून आले या आंदोलनासंदर्भात माहिती देताना उपस्थित कर्मचार् यांनी स्पष्ट केले की शासनाकडून मागील झालेल्या करारानंतरची थकबाकी अजून प्राप्त झाली नसून चालू वर्षीच्या दिवाळी बोनस बाबतही मागणी दुर्लक्षित आहे गेल्या काही वर्षांतील महामंडळावर आलेल्या अडचणी लक्षात घेता कामगार संघटनांकडून महामंडळाचे शासनामध्ये विविध विलीनीकरण करावे अशी मागणी केली जात आहे या सर्व मागण्यांकडे शासनाकडून होणार्या दुर्लक्षाविरोधात एसटी महामंडळाच्या विभागीय कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून आझाद मैदानात सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून जिल्ह्यातील सर्व एसटी डेपोचे कामकाज आज बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. कामगार संघटनांनी घेतलेल्या या बंदचे दृश्य परिणाम संपूर्ण तालुक्यात दिसून आला दिवसभरात आज एसटी आगारातून कोणतीही गाडी जाणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने ग्रामीण भागातील जनतेला पर्यायी मार्गाचा खाजगी वाहनांमधून प्रवास करावा लागणार आहे.

दरम्यान या आंदोलनासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी एसटी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवासी वर्गाला ही एस टी चा प्रवास सुरु होईल अशी अपेक्षा कर्मचारी वर्गाकडून होत आहे.

# गुटखा विक्रेत्याकडून लाचेची मागणी करणाऱ्या अंमली पदार्थ विरोधी पथकातील दोन पोलिसांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस हवालदाराला गुटखा व पान मसाला व्यवसायिकाकडून लाच स्विकारताना रंगेहात पकडल्याची गत जुलै महिन्यातील घटना ताजी असतानाच, अंमली पदार्थ विरोधी पथकातील आणखी दोघा पोलीस कर्मचाऱ्यांनी पान मसाला विक्रेत्याकडे गुटखा व पान मसाल्याचा धंदा सुरु ठेवण्यासाठी दरमहा १५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे उघडकिस आले आहे. त्यामुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने या दोन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत गुन्हा दाखल करण्यात आलेल्यामध्ये पोलीस शिपाई बाबासाब मधु सांगोलकर व पोलीस हवालदार इक्बाल बशिर शेख या दोघांचा समावेश असून हे दोघेही नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकात कार्यरत आहेत. या प्रकरणातील तक्रारदार मोहम्मद फैज निजामुद्दीन सय्यद हा सीवूड्स मध्ये रहाण्यास असून त्याचा पान मसाला व गुटखा विक्रीचा व्यवसाय आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाला याबाबतची माहिती मिळाल्यानंतर या पथकातील पोलीस कर्मचारी सांगोलकर व शेख या दोघांनी मोहम्मद फैज याला मान मसाल्याचा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्याला दरमहा १५ हजार रुपये द्यावे लागतील असे सांगितले होते.

त्यामुळे मोहम्मद फैज याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवरून लाच लुचपत विभागाने पडताळणी केली असता, अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस शिपाई बाबासाब मधु सांगोलकर याने वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी लाचेची मागणी केल्याचे तर पोलीस हवालदार इक्बाल बशिर शेख याने त्याला प्रोत्साहन दिल्याचे आढळुन आले. त्यामुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने या दोन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# संत निरंकारी मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

संत निरंकारी मंडळ चोरिवली यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे दिल्लीसह महाराष्ट्रात अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच वैद्यकीय उपक्रम राबवित संत निरंकारी मंडळाने कायम सामाजिक बांधिलकी जपली आहे. सदगुरू माता सुदिक्षाजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या रायगडच्या ४०(अ) झोन अंतर्गत ब्रांच चोरवली ता. तळा यांच्या तर्फे रविवार दिनांक ३१.१०.२१ रोजी सकाळी ९ ते १.३० वाजेपर्यंत तळा शहरातील कुणबी भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर कोरोना संदर्भातील सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून केले जाणार आहे. रक्त संकलन शासकीय रक्तपेढी अलिबाग रायगड यांच्या मार्फत होणार आहे.

संत निरंकारी मिशनच्या रक्तदनाचा हा सामाजिक पैलू मनुष्यमात्राच्या मनामध्ये मानवतावादी भावनांना उदयोन्मुख करत आहेत. आपण केलेल्या रक्तदानामुळे अनेक गरजुंचे प्राण वाचवता येतात एक सामाजिक जबाबदारी म्हणुन आपल्याकडून खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करत असलेल्या संत निरंकारी मंडळातर्फे या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान करा जीवनदाते व्हा असा नारा देत या सुवर्ण संकल्पात सर्व समाज बांधवांसह व आपल्या मित्र परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून सहकार्य करावे असे आवाहन संत निरंकारी मंडळ चोरीवलीचे मुखी गणेश राणे यांनी केले आहे.

# ऐन दिवाळीच्या तोंडावर पालीत खड्ड्यांसह धुराळ्याची आतिषबाजी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

प्रख्यात अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली समस्यांचे माहेरघर बनलंय. पालीतील रस्त्यांची प्रचंड दुरावस्था आहे. गावातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी भले मोठे खड्डे पडले आहेत.

तब्बल ३ ते ४ वेळा खडी व ग्रीट टाकून हे खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात आले आहेत. मात्र अवजड व डंपर वाहतुकीमुळे पुन्हा खड्ड्यांनी डोकं वर काढले आहे. शिवाय खड्ड्यात टाकलेली खडी व ग्रीट बाहेर येऊन खूप मोठ्या प्रमाणात धुरळा उडत आहे. मोटारसायकल घसरून अपघात देखील होत आहेत. त्यामुळे रोगापेक्षा इलाज भयानक असे म्हणण्याची वेळ पालीकरांवर आली आहे. पावसाळ्यात तर या मार्गावर अक्षरश तलावजन्य परिस्थिती दिसून आली.

खराब रस्त्यामुळे ऐन सणासुदीला व बल्लाळेश्वराच्या



दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व खरेदीसाठी पालीत येणाऱ्या नागरिकांची खूप गैरसोय होत आहे. पाली स्टेट बँक पासून गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळी पर्यंतचा रस्ता, भोई आळी, मिनिडोअर स्टँड ते बसस्थानक पर्यंतच्या रस्त्याची भल्या मोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. त्याचबरोबर बल्लाळेश्वर नगर, धुंडीविनायक नगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता प्रचंड फुटला आहे.

डंपर व अवजड वाहने गेल्याने खड्ड्यातील बारीक खडी रस्त्यावर पसरल्याने दुचाकी वाहने घसरतात. अपघाताचे प्रमाण देखील वाढले, येथील कुंभारआळी जवळ दुचाकीस्वार घसरून पडला. तर २ महिन्यांपूर्वी एक शिक्षिका दुचाकीवरून खड्ड्यात आढळून पडल्या होत्या. यात त्यांना मुका मार देखील लागला. असे अपघात वारंवार घडत आहेत. खड्डे व खडीमुळे पादचाऱ्यांना चालतांना कसरत करावी लागते. विद्यार्थी, महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. खड्ड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होत आहे. प्रत्येकजण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.